VOL- VII ISSUE- V MAY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# भारताला आपले आयुष्य वेचणारा महान मिशनरी:- ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्ट्रेझ

*विश्वास गोरखनाथ वळवी,*
संशोधक विद्यार्थी
सामाजिक शास्त्रे प्रशाळा,इतिहास विभाग,
कबचौउमवि,जळगाव

**प्रस्तावना:-**

“ १८ शतकाच्या प्रसंगी,ज्यावेळी जेसुइट्स तामिळनाडूत कार्य करत होते त्यावेळेस प्रोटेन्टस मिशनरीसुद्धा दक्षिण भारताच्या या भागात आले.पोर्तुगल वगळता युरोपच्या इतर व्यवसायिक कंपन्या भारतात आधीच पोहचलेल्या होत्या.अधिकांश नवोदित हे प्रोटेन्टस होते.”१. भारतात अनेक मिशनरी येऊन गेले पण त्यातच आपले ठसे पाडणाऱ्या काही महान मिशनरीत ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ याची गणना केली जाते त्यांनी आपल्या प्रामाणिक आणि कष्टप्रद कार्यातून मिशनरी कार्याला उंचीवर नेऊन ठेवले.भारतात येऊन त्यांनी बर्थलमय याचा वारसा पुढे नेला.आणि भारतीय समाजव्यवस्थेत अनेक बदल घडवून आणले.लोकांनी त्यांना मृतीपुजा,बालविवाह,या प्रथां चांगल्या कि वाईट असे प्रश्ने विचारले पण साहेबांनी आपल्या प्रेमळ आणि सरळ उत्तराने अनेक जाती-धर्माच्या लोकांची मने जिंकण्यास सफळता प्राप्त केली.भविष्यात येणाऱ्या अनेक मिशनरी आणि मिशनरी संस्थेसाठी महत्वपूर्ण ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांनी खोलून दिले.भारतीय धर्मात ढवळाढवळ न करता त्यांनी ख्रिस्ताचा प्रचार आणि प्रसार केला.त्याचे शिक्षण हे सामान्य लोकांसाठी मुक्तीचा द्वार होते.सामान्य लोकांचे कल्याण हेच त्याचे ध्येय होते मग ती भौतिक अथवा आत्मिक असो त्यांनी त्या सोडवण्याच्या परिपूर्ण प्रयत्न केला.

**ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांचा सुरुवातीचा काळ :-**

"१७२६ सालच्या ओक्टोम्बर महिन्याच्या अखेरीच्या सुमारास,एके दिवशी सानबर्ग नावाच्या प्रशियातील एका गावात,गोष्ट घडली तिला हिंदी मिशनच्या आख्यायिकात कायमचे स्थान मिळाले आहे.या गावात धार्मिक वृत्तीची एक बाई मरायला टेकली होती.इहलोक सोडून जावे लागण्यापूर्वी तिने आपल्या नवऱ्याला व पाळकाला शेवटची एक विनंती करायला, बोलावून घेतले.ते आल्यावर आपले बाळ-मुलगा उचलून घेउन,पृथ्वीवर दुसरी हंना अवतरल्यासारखेच,तिने हे बाळ प्रभूला अर्पण केले व "पुढे पाळकाचे काम करायची या मुलाची इच्छा दिसून आली तर त्याला प्रोत्साहन देऊन ती इच्छा वाढीस लावून पुरी करण्याच्या कामी मी त्याला मदत करिन. असे आपल्या नवऱ्याकडून वचन घेतले.अशा रीतीने देवाच्या सेवेला वाहिलेले हे बाळ,लहानाचे मोठे होऊन,७० वर्षांनी दक्षिण हिंदुस्थानात

तंजावर शहरी मरण पावले "२ अशा प्रकारे ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांची हि जन्माची अद्भूत गाथा घडून चुकली.आणि मोठे झाल्यावर ते भविष्यातील आपल्या महान मिशनरी कार्याची तयारी लागले.

**ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांचे भारतातील मिशनरी कार्य :-**

'' ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ याच्या हातून अनेक दृष्टीनी अत्यंत उपयुक्त अशा भरपूर गोष्टी झाल्या. याच्याइतके ख्रिस्ती सामर्थ्य इतरांत कधी दिसून आले नाही.इतके हे बाळ असामान्य निघाले.हे बाळ म्हणजे ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ आईने देवाला अर्पण केलेला पुत्र म्हणून त्याच्या बापाने त्याला लहानपणापासूनच आध्यात्मिक शिक्षणाचे धडे द्यायला सुरुवात केली. हॅले युनिव्हर्सिटीत आपले शिक्षण पूर्ण करून २४ व्या वर्षी पाळक म्हणून दीक्षा घेतली.बर्थलोमस जिगंनबलग याच्या मृत्यूनंतर ३१ व्या वर्षी तो भारतात आला.पुढे ४७ वर्षे त्याने भारतात ख्रिस्ताचा मिशनरी कार्यासाठी स्वतःला वाहून दिलेख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझने हिंदुस्थानाच्या सेवेला स्वतःला वाहून घेतले व त्याच्या पत्रांवरून तरी मायदेशी परत जाण्याची त्याला कधी इच्छाच झाली नाही,असे दिसते.हिंदुस्थानाला आपला देश मानून तो येथेच राहिला,येथेच त्याने कष्ट केले व शेवटी येथेच तो मरण पावला.''३

भारतात राहून आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांने फक्त सहा हजार लोकांना बाप्तिस्मा दिले पण त्याचे कार्य हे एवढे परिवर्तनशील होते कि त्याच्या मृत्युनंतर अनेक लोक ख्रिस्ती धर्माकडे येऊ लागले.भारतीय समाजातील प्रत्येक जाती-धर्माच्या मित्र म्हणून ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांची ख्याती होती.ब्रिटीश लोकानी भारतावर आपली हुकुमत चालवीत होते त्यामुळे ख्रिस्ती लोकाप्रती भारतीय समाजात द्वेषभाव होता पण तो सर्व ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांनी आपल्या शुद्ध आणि पवित्र जीवनाने नाहीशा केला.

''त्याच्या मृत्यूची बातमी लोकांना कळली तेव्हा संबंध देशभर ''भला पाद्री गेला'' असा हाहाकार उठला.राजवाडे,शेतकरी, सैनिक, नागरिक, ख्रिस्ती,हिंदू व मुसलमान सारे आपला एक मित्र गेला,म्हणून हळहळू लागले.इतक्या निरनिराळ्या जातीच्या,धर्माच्या,वंशाच्या,वर्गाच्या व दर्जाच्या लोकांनी ख्रिस्ती मिशनरी वारल्यामुळे इतके दुख कधीच झालेले नसेल असे वाटते...आपल्या परमपूज्य पाळकाची शेवटची घटका भरत आल्याचे ऐकून सर्फोजी राजा त्याच्या भेटीला गेला होता.''३ त्याच्या मृत्यदिनी जणू अनेक जाती-धर्माच्या लोकांचा लोंडाच आला ते सर्व जात-पात विसरून त्या मिशनरीला आपल्या प्रीतीचे चुंबन द्यायला त्या दिवशी धजले नाही.त्यांनी त्याच्या कार्याच्या गौरव केला आजपर्यंतच्या इतिहास एवढा मोठा मान-सन्मान कोणत्याही मिशनरीला भारतात दिला गेला नाही.''हिंदी प्रोटेन्टेत मिशनरीपेक्षा त्याच्या हातून जास्त लोक ख्रिस्ती झाले नाही त्याने ६००० लोकांना बाप्तिस्मा दिला,असे म्हणतात.पण त्याची सर्वात श्रेष्ट कामगिरी सेवा म्हणजे त्याचे स्वत:चे उदाहरणच,स्वत:च्या उदहरणाने त्याने

VOL- VII ISSUE- V MAY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

ख्रिस्ताची इतकी थोरवी दाखवून दिली,त्याची इतकी प्रशंसा केली कि,ज्या हजारो लोकांनी त्याच्या धर्माचा अंगीकार केला नाही,त्यानाही ख्रिस्ताचा हा विश्वासू व एकनिष्ठ आणि त्यांना आदरणीय वाटणारा सेवक पाहायला मिळाल्यामुळे,ख्रिस्ती धर्माची व त्याच्या कित्ता यथार्थ कल्पना आली.ते त्याला आदराने वागवू लागत व त्याचा कित्ता गिरविण्याचीही त्यांना स्फूती होई.''४

**निष्कर्ष :-**

ख्रिस्ती समाजातील प्रत्येक आई ही बायबल वुमन असते.तिने आपल्या बाळाला मिशनरी कार्यासाठी अर्पण करावयास मृत्यूच्या ठिकाणी देखील तयार हवे.एक वडील म्हणून नाही तर एक ख्रिस्ती शिक्षक म्हणून प्रत्येक ख्रिस्ती बापाने* आपल्या बाळाला लहापासूनच आध्यात्मिक शिक्षणाचे धडे द्यायला हवे.ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ यांनी आपला उद्देश चुकू दिला नाही.प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला देवाने काही उद्देश दिला आहे,त्याप्रति त्यांनी मरेपर्यंत प्रामाणिक असले पाहिजे.ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ याने आपल्या आईच्या अर्पणाला आणि समर्पणाला पूर्ण केले. आज आधुनिक मंडळीत जवळ-जवळ प्रत्येक बाळाला अर्पण केले जाते.तरुण होऊन या मुलांना हे माहीत असते माझे ख्रिस्तासाठी अर्पण झाले आहे.तरी ते समर्पित होत नाही.अशा तरुणांनी ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ याचे जीवनचरित्र नक्कीच वाचावे. आधुनिक ख्रिस्ती मंडळीने आणि पाळकांनी ख्रिश्चन फेड्रीक श्वाट्रेझ याचा कित्ता गिरविल्यास नक्कीच ख्रिस्ती धर्मात परिवर्तनशील प्रवाह येईल आणि सत्य लोकांपर्यंत पोहचेल.

**संदर्भग्रंथ सूची :-**


१) भारत घडो.डॉ बाकू के वर्गीस. डब्लू. ओं.सी.पब्लिशिंग.मुंबई.पृ क्र-२९
२) भारतात आलेले प्रेषित,जे.एन.ओग्वली. बॉम्बे ट्रक अंड बुक सोसायटी.मुंबई पृ क्र२३३
३) भारतात आलेले प्रेषित,जे.एन.ओग्वली. बॉम्बे ट्रक अंड बुक सोसायटी.मुंबई पृ क्र२३३
४) उपरोक्त-पृ क्र२६५-६७.